**Providing right of self-perceived gender identity to the Transgenders for the purpose of contesting local body elections….**

# STATE ELECTION COMMISSION
## MAHARASHTRA

No. SEC/GPE-2021/CR 7/D-8
New Administrative Building, Opp.
Mantalaya, Madame Cama Road,
Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032.
Date:-27/08/2021

### Order

Whereas the Superintendence, direction and control of all the elections to the Panchayats and the Municipalities in the State of Maharashtra are vested in the State Election Commission of Maharashtra; in accordance with the provision of Articles 243-K, and 243-ZA of the Constitution of India;

And whereas, as envisaged in the provisions made by the Constitution (Seventy-third) amendment Act, 1992 and the Constitution (Seventy-fourth) amendment Act, 1992, it is intended inter alia to ensure regular, timely, free, and fair elections to the Panchayats and the Municipalities under the superintendence, direction and control of the State Election Commission;

And whereas, the Hon'ble Supreme Court in its landmark judgment delivered in Writ Petition (Civil) 400 of 2012 has observed that, the gender identity is integral to the dignity of an individual and is at the core of "personal autonomy" and "self-determination" and the

Court has directed that Transgenders shall be considered as 'Third Gender'.

And whereas, the Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019 Section 4 sub- section (2) provides that 'a person recognised as transgender under sub-section (1) shall have a right to self-perceived gender identity'.

And whereas, the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench in its Order dtd. 02/01/2021 in Writ Petition (stamp) 104 of 2021 [Anjali Guru Sanjana Jaan Vs. State and others reported at 2021 (1) ALL MR 422], has observed that the directions of the Apex Court and the corresponding provisions of the Act of 2019 are required to be followed and thereupon directed that in respect of the nomination forms of the transgender should be accepted in the category of their self-perceived gender identity.

And whereas, there are no provisions in law, as to from which gender and on which seat the transgender can contest the election, which leads to confusion, and hence there is a need to provide for the same.

And therefore, in order to have regard to the basic right of the transgenders to contest the elections in accordance with the provision of self-perceived gender identity as provided in the Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019, and to avoid any confusion

with respect to their nomination forms, the State Election Commission has decided to provide for the same.

Now therefore, in exercise of the powers conferred by Articles 243-K and 243-ZA of the Constitution of INDIA, read with provisions of sub-election (4) of section 18A of the Mumbai Municipal Corporation Act (Bom. III of 1888), sub – section (4) of section 14 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949, (Bom. LIX of 1949), sub-section (4) of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act 1965; sub section 4 of section 10A of the Maharashtra Village Panchayats Act 1958 (Bom. III of 1959), sub-section (4) of section 9A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act 1961 (Mah. V of 1962) and of all other enabling powers of the State Election Commission in this behalf, the following directions are given:

**ORDER**

1. ***All Transgender shall have the right to self-perceived gender identity for the purpose of contesting elections to a local body.***
2. ***The said contesting person should have been using the same chosen gender for all other purposes.***
3. ***The said contesting person shall give an affidavit declaring that the person is using the same chosen gender for all other purposes and shall not switch over that gender driven by opportunism, except after following due process as***

***provided in Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019.***

4. ***Directions of State Election Commission dtd. 24/11/2011 issued in this behalf are hereby cancelled.***

By Orders & directions of State Election Commissionerण्

(Kiran Kurundkar)
Secretary
State Election Commission

Copy to:

1. All Divisional Commissioners
2. All Collectors
3. All Municipal Commissioners
4. All Chief Executive Officers, Zilla Parishad
5. All Chief Officers, Councils & Nagar Panchayat
6. All Tahsildars
7. All SEC Panel Advocates
8. All Desks of SEC
9. Select File

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता तृतीयपंथी व्यक्तीने स्वत: घोषित केलेल्या लिंगाच्या पर्यायानुसार निवडणूक लढविण्याचा हक्क देणेबाबत.

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र. ०७/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, २०२१

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, घटना (७३ वी) दुरुस्ती अधिनियम, १९९२ आणि घटना (७४ वी) दुरुस्ती अधिनियम, १९९२ च्या हेतूने ठरविल्यानुसार पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुका नियमित, विहित मुदतीत, मुक्त आणि स्वच्छ वातावरणात पार पाडण्याकरिता अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) ४००/२०१२ मध्ये दिलेल्या महत्वपूर्ण निवाड्यामध्ये असे निरीक्षण नोंदविले आहे की, एखाद्या व्यक्तीच्या अस्तित्वाकरिता त्याच्या लिंगाची ओळख हा अविभाज्य भाग असून “व्यक्तिगत स्वायत्तता” आणि “आत्मनिर्णय” याचा गाभा विचारात घेऊन तृतीयपंथीयांचा तृतीय लिंग (Third gender) यामध्ये विचार करण्याचे निर्देश दिले.

आणि ज्याअर्थी, तृतीयपंथी व्यक्तींच्या (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ च्या कलम ४ उपकलम २ मधील तरतुदीनुसार उपकलम १ अंतर्गत तृतीयपंथी म्हणून ओळखल्या गेलेल्या व्यक्तीला स्वत:ची लिंग ओळख करुन देण्याचा अधिकार असेल.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल झालेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) १०४/२०२१ (अंजली गुरु संजना जान विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर (reported at 2021(1) ALL MR 422)) मध्ये दि. २ जानेवारी, २०२१ रोजी दिलेल्या आदेशात असे निरीक्षण नोंदविले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे आणि सन २०१९ च्या कायद्यातील संबंधित तरतुदींचे पालन करणे आवश्यक असून त्यानुसार तृतीयपंथी उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र हे त्याने स्वसमजानुसार घोषित केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्विकारणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, तृतीयपंथी व्यक्तीस कोणत्या लिंगाच्या आधारे कोणत्या जागेवरुन निवडणूक लढविता येईल याबाबत अधिनियमात तरतूद नसल्यामुळे संभ्रम निर्माण होऊ शकतो आणि त्याकरिता तरतूद करण्याची आवश्यकता आहे

आणि म्हणून तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ मधील तरतुदीनुसार तृतीयपंथी व्यक्तीच्या निवडणूक लढविण्याच्या मुलभूत अधिकारांचा विचार करण्यासाठी आणि संभ्रम टाळण्यासाठी त्याने स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे त्याच्या नामनिर्देशनपत्राचा निर्णय घेण्याकरिता तरतूद करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०अ(४), महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## आदेश

१) सर्व तृतीयपंथींना त्यांनी स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याचा अधिकार असेल.

२) अशा निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने इतर सर्व हेतूंसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर केलेला असावा.

३) अशी निवडणूक लढविणारी व्यक्ती इतर सर्व कारणांसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर करेल, आणि तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ मध्ये दिलेल्या योग्य प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय केवळ संधी आहे म्हणून लिंगाची ओळख बदलणार नाही असे शपथपत्र देईल.

४) राज्य निवडणूक आयोगाने दि. २४ नोव्हेंबर, २०११ अन्वये यासंदर्भात दिलेले निर्देश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
५. नगरपरिषदा / नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
६. सर्व तहसिलदार
७. राज्य निवडणूक आयोगाचे तिनही खंडपीठावरील वकील
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती